# ठाण्याजवळ रेल्वे दुर्घटना;चार रेल्वे प्रवाशांचा जागीच मृत्यु

ठाणे (सरकार): मध्य रेल्वेच्या दिवा- मुंब्रा स्थानकादरम्यान ट्रेनमधून पडून पाच प्रवाशांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली. फास्ट लोकल एकमेकांच्या शेजारून जात असतानाच हा भीषण अपघात झाला. मुंब्रा आणि दिवा रेल्वे स्थानकांदरम्यान सीएसएमटी लोकल आणि कसारा लोकल एकमेकांना ओलांडत असताना ही घटना घडली. एक लोकल कसाऱ्याकडे तर दुसरी कसारा लोकल ही सीएसएमटीकडे जात असताना ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाकडून रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आणि जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

सीएएमटीकडून कसाऱ्याकडे जाणाऱ्या फास्ट लोकलमधून पडून या प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दुसरी लोकल सीएसएमटीकडे जात असताना कसारा फास्ट लोकल बाजूने जात होती. त्याचवेळी आठ प्रवासी हे लोकल ट्रेनमधून पडले. यामध्ये सात पुरुष आणि एका महिलेचा समावेश होता अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. पाच प्रवासी मुंब्रा स्थानकाच्या जवळ एका ट्रेनमधून पडल्याची माहिती मिळाली आहे. ही गाडी कसाऱ्याला जात होती. त्यातील गार्डने ही माहिती दिली. दिवा आणि मुंब्रा येथून रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्निल लीला यांनी दिली. ठाण्यातील मुंब्रा रेल्वे स्थानकावर सीएसएमटीकडे जाणारे काही प्रवासी ट्रेनमधून पडले. ट्रेनमध्ये जास्त गर्दी असल्याने हा अपघात झाल्याचे


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar





मानले जात आहे. रेल्वे प्रशासन आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात येत आहे. अपघाताची चौकशी सुरू झाली आहे. या घटनेमुळे स्थानिक सेवांवरही परिणाम झाला आहे, अशी माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे.


बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २५६ वा ■ सोमवार ९ जून २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १० जून २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 256 ■ Monday 9 June 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आ.संदीप क्षीरसागरांच्या विरोधात दंड थोपटले

# बीड मतदारसंघातील कामे आडविल्याने सत्ताधाऱ्यांचा आक्रोश

बीड (सरकार)तालुक्यातील ग्रामीण भागातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील ग्रामीण रस्त्यांची कामे आ.संदीप क्षीरसागर यांनी अडविल्याचा आरोप करत अनेक गावचे सरपंच, पदाधिकाऱ्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी (दि.९) सकाळी ११ वाजता लक्षवेधी धरणे आंदोलन सुरू केले आहे.

हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नाळवंडीचे सरपंच ॲड .राजेंद्र राऊत, भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, युवा नेते महेश धांडे, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ.लक्ष्मण जाधव, महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.सतीश शिंदे, भाऊसाहेब डावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अरुण लांडे, प्रदीप गायकवाड, सरपंच धनेश्वर खेत्रे, दत्ता जाधव, रोहित जाधव, सिद्धार्थ जाधव, राजाभाऊ नवले, लकी



कंडेरे, राजू टाक, सुमंत राऊत, नामदेव म्हेत्रे, सखाराम राऊत, सचिन उनवणे यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते. ॲड.राजेंद्र राऊत यांनी म्हटले की, आ.संदीप क्षीरसागर यांच्या दबावतंत्रामुळे अधिकारी रस्त्याचे मार्कआऊट देत नसून रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे आमदारांसह अधिकाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आंदोलन करत असल्याचे सांगितले. बीड तालुक्यातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील नाळवंडी ते मौज व्ही.आर.क्र. २४३ काळेगाव हवेली ते लमाण तांडा रस्ता व्ही.आर. ३५४, ओडीआर ५० ते मानकुरवाडी रस्ता व्ही.आर. ३७, पाली ते वरवटी इजिमा १२७, पाली ते वरवटी इजिमा १२७ यांसह इतर अनेक रस्ते सुधारणा अंतर्गत कामे आहेत. सदर रस्ते हे जिल्हा नियोजनमधून सन २०२४ या वर्षामध्ये मंजूर आहेत. सदर रस्त्याचे कार्यारंभ आदेश ६ महिन्यांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्याचे काम सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर झाले असून, डिसेंबर २०२४ मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश निघाले आहेत. मात्र, बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता, उपअभियंत्यांकडून अद्यापही कामाचे मार्कआऊट देण्यात आलेले नाहीत. आ.संदीप क्षीरसागर यांना ज्या भागातून अल्प मतदान झाले, त्या त्या भागातील कामे थांबवण्यात येत असल्याचा आरोप सरपंच ड.राऊत यांनी केला आहे. यापूर्वीही त्यांनी अनेक विकासकामात खोडा घातला, परंतु यापुढे त्यांची मनमानी सहन केली जाणार नाही, त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविला जाईल, असा इशाराही ड.राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील अनेक गावचे सरपंच, पदाधिकारी, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सुधार ग्रहातून पळून गेलेल्या दोन अल्पवयीन मुली पोलिसांच्या ताब्यात

बीड (सरकार) पोलीस ठाणे वडवणी येथील २० दिवसापूर्वी व पोलीस ठाणे दिंद्रुड येथील चार ते पाच महिन्यापूर्वी ०२ अपहरणाचे गुन्हे दाखल होते या गुन्ह्यामध्ये पीडिता असलेल्या ०२ अल्पवयीन मुली सरकारी महिला स्वाधार गृह बीड येथे दाखल होत्या. दिनांक ०७ जून २०२५ रोजी सकाळी या दोन्ही अल्पवयीन मुली महिला स्वाधार गृहातून पळून गेल्या.



याची माहिती वडवणीच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना मिळाली, अशा मुली शहराबाहेर गेल्या तर त्यांचा कुणीही गैरफायदा घेऊ शकतो याचे गांभीर्य ओळखून त्याचे शोधाबाबत अधिक तपास केला असता, या दोन्ही मुली विठ्ठल रखुमाई मंदिर, ग्रामसेवक कॉलनी बीड,परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून वडवणीचे दुय्यम अधिकारी चव्हाण यांना सदर ठिकाणी तात्काळ पाठवून त्या दोन्ही अल्पवयीन मुलींना थांबवून ठेवले, व शिवाजीनगर पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक श्री पवार यांना फोन करून माहिती देत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथील स्टाफ बोलावला. दोन्ही मुली पुन्हा स्वाधारगृहात दाखल करण्यासाठी शिवाजीनगर महिला पोलिसांचे ताब्यात दिल्या.त्यानंतर त्या महिला स्वाधारगृहाचे यांचेमार्फतिने अध्यक्ष बालकल्याण समिती यांच्याकडे हजर करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण व शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे क्ऊ १६६४ रविंद्र गोवर्धन आघाव १०३४,शीतल केशव जोगदंड,झल २०७७ बाळु बाजीराव राहाडे, २७३ नवनाथ बंडू डाके यांनी केली आहे.

## मुलगी जन्मली म्हणून घराबाहेर काढले

बीड (सरकार): आधी चारित्र्यावर संशय घेत मारहाण करून घराबाहेर काढले. त्यानंतर समजूत काढून नांदायला पाठविले. यादरम्यान विवाहिता गर्भवती राहिली. तिने एका गोंडस मुलीला जन्मही दिला. परंतु, तुला मुलगी कशी- जन्मली, आम्हाला मुलगा हवा होता, म्हणत बीडमधील लेकीचा पुण्यातील सासरच्या लोकांनी छळ केला. त्यानंतर तिला मुलीसह घराबाहेर काढले. या प्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात पतीसह चौघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुण्याच्या वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर आता हा एक प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

सुनीता (नाव बदलले - वय ३०, रा. पुणे, ह.मु. बीड) हिचा पुण्यातील सोहम (नाव बदलले) याच्यासोबत १ जून २०२१ रोजी विवाह झाला. सर्व मानपान आणि संसारोपयोगी साहित्यही दिले. विवाहानंतर सहा महिने सुनीताला सुखाने नांदवले; पण, त्यानंतर तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ सुरू झाला. काही दिवस सहन केल्यानंतर सुनीताने या त्रासाबद्दल ४ फेब्रुवारी २०२२ रोजी आई-वडील व भावाला माहिती दिली. ते पुण्याला गेले आणि सुनीताला बीडला घेऊन आले. त्यानंतर काही दिवसांनी सुनीताच्या माहेरच्या लोकांना पुण्यात बोलावून घेतले. मिटविण्यासाठी बैठक झाली. त्यानंतर १३ मार्च २०२३ रोजी सुनीताला सासरी नेऊन सोडले. पुन्हा चार महिने सुखाने नांदविले. याच दरम्यान सुनीता गर्भवती राहिली. तरीही शारीरिक व मानसिक त्रास कमी झाला नाही.

परंतु, गर्भवती असल्याने तिने हे सर्व सहन केले. त्यानंतर २५ जानेवारी २०२४ रोजी सुनीताची प्रसूती झाली आणि तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. परंतु, सासरचे यामुळे नाराज झाले. आम्हाला मुलगा हवा होता, तुला मुलगी कशी झाली? म्हणून त्रास दिला. उपाशीपोटी ठेवले. हे प्रकार वाढतच गेले आणि २३ मे २०२५ रोजी सुनीताला सासरच्या लोकांनी घराबाहेर काढले. त्यामुळे ती माहेरी आली. त्यानंतर शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठत तक्रार दिली. त्यावरून पतीसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांना यलो अलर्ट



मुंबई (सरकार): महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावत वातावरणात गारवा निर्माण केला असला तरी, पुढील ४८ तास राज्यासाठी निर्णायक ठरणार आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, ९ आणि १० जून रोजी राज्याच्या विविध भागांमध्ये हलका ते मध्यम पावसासह वादळी वारे आणि मेघगर्जना होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे १३ जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाची तीव्रता अधिक राहणार आहे. विशेषतः पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांना हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिला आहे. या भागांमध्ये ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, नागरिकांनी सुरक्षिततेच्या उपाययोजना ठेवाव्यात. विदर्भात पावसाची चाहूल लागण्याआधी नागपूरसारख्या शहरांमध्ये उष्णतेचा कहर कायम आहे. सध्या तापमान ४३ अंशांवर पोहोचले असून, उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. मात्र, बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे १२ जूननंतर मान्सून विदर्भात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दरम्यान, पुढील तीन ते चार दिवस तुरळक पावसासह उष्णता कायम राहण्याचा अंदाज आहे.

## चोरट्यांनी महिलेचे गंठण केले लंपास

बीड (सरकार): शहरातील स्वामी समर्थ मंदिराच्या बाजूला असलेल्या सिद्धिविनायक भोजनालया समोरून जात असताना दोन अज्ञात चोरट्यांनी गळयातील मिनी गंठण लंपास केल्याची घटना रविवार (दि.८) सायंकाळी ६ च्या दरम्यान घडली असून चोरटयांनी ७०,८०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड शहरात मागिल काही दिवसांपासून चोरीच्या घटनेत वाढ होताना दिसत आहे. शिल्पा अमोल वाव्हळ (वय ३८) व्यवसाय घरकाम रा.फुलाईनगर बीड ह्या शहरातील स्वामी समर्थ मंदिराच्या बाजूला असलेल्या सिद्धिविनायक भोजनालया समोरून पाई चालत जात असताना दोन अज्ञात चोरटयांनी त्यांच्या गळ्यातील १३ ग्रॅमचे मिनी गंठण असा एकूण ७०,८०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवार (दि.८) सायंकाळी ६ च्या दरम्यान घडली असून अज्ञात दोन चोरट्यांविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात (दि.८) जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## रांजणगाव तिहेरी हत्याकांडाचे गूढ उलगडले

बीड (सरकार)पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथे २५ मे रोजी एका २५ वर्षीय महिला आणि तिच्या दोन लहान मुलांचे अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. तपासात या महिलेची ओळख पटवण्यात पोलिसांना १० दिवस लागले. अखेर या तिहेरी हत्याकांडाचा उलगडा झाला असून मृत महिला बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील वाघोरे गावची असल्याचं निष्पन्न झालं आहे.

या घटनेत मृत महिलेसह तिच्या १ व २ वर्षांच्या चिमुकल्यांची निर्दय हत्या करण्यात आली होती. सुरुवातीला ही महिला या परिसरातील कोणालाही ओळखीची नव्हती. त्यामुळे तपास गुंतागुंतीचा ठरला. परंतु, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली ६ विशेष तपास पथकांची नेमणूक करण्यात आली होती. राज्यातील ३३ पोलिस ठाण्यांचे सहकार्य, १६,५०० भाडेकरूंची चौकशी आणि २५० सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण यामुळे आरोपी



गजाआड गेला. तपासादरम्यान, बीड जिल्ह्यातील माजलगाव येथून स्वाती केशव सोनवणे ही महिला आणि तिचे दोन मुलगे स्वराज (२) व विराज (१) बेपत्ता असल्याचे निष्पन्न झाले. तिचा पती केशव सोनवणे याच्याकडे चौकशी केली असता, त्याने पत्नी वादावादीमुळे वेगळी राहत असल्याचं सांगितलं. तपास अधिक खोलवर जात असताना समोर आलं की स्वातीचे तिच्या पतीसोबत वाद होते आणि तिचे गोरख बोखारे नावाच्या व्यक्तीसोबत अनैतिक संबंध होते. सतत लग्नासाठी तगादा लावल्यामुळे गोरखने तिला आणि तिच्या दोन चिमुकल्यांना फसवून रांजणगावला नेलं आणि स्वातीची तिच्याच ओढणीने गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिच्या दोन्ही मुलांनाही ठार केलं. पुणे ग्रामीण पोलिसांनी १० दिवसांच्या अथक तपासानंतर आरोपी गोरख बोखारेला अटक केली आहे.

## १४ जूनपर्यंत पेरणी करू नये-कृषी विभागाचा सल्ला

पुणे (सरकार): राज्यात मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी सूचना जारी केली आहे. १४ जूनपर्यंत मान्सूनची शक्यता कमी असल्याने पेरणीसाठी घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात तापमान वाढण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांनी पेरणीची घाई टाळावी, असा सल्ला देण्यात आला आहे.



मुंबई: राज्यात कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाने धुमाकूळ घातला असला तरी विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक ठिकाणी पावसाने ओढ दिली आहे. सदर जिल्ह्यांमध्ये मान्सूनची प्रतीक्षा अजून काही दिवस लांबणीवर पडली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना जारी केली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये १४ जूनपर्यंत मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात तापमान वाढण्याची शक्यता आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून मान्सूनचा प्रवास थांबला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १५ जूनपर्यंत मान्सूनची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे, पश्चिम किनारपट्टी वगळता इतर भागांतील तापमान वाढण्याची शक्यता आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात तापमान अधिक राहील, असा अंदाज आहे. विदर्भात तापमान ४५ अंशांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. तर, विदर्भातील अनेक भागांमध्ये तापमान ४० अंशांपेक्षा जास्त राहू शकते. मराठवाडा आणि खानदेशातही तापमान ४० अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणी आणि लागवड करताना घाई न करण्याचे आवाहन केले आहे.

# संपादकीय


## राहुल गांधींना निवडणूक आयोगाची चपराक

सातत्याने एकच गोष्ट खोट बोलत राहिलो की, तीच गोष्ट लोकांना खरी वाटू लागते. असेच तत्त्वज्ञान गोबेल्स या हिटलरच्या युद्ध विशारदाने वापरले होते. त्यामुळे हिटलरचा विजय झाला नाही, पण हिटलरच्या म्हणण्यात तथ्य आहे असे वाटू लागले. तीच गोष्ट राहुल गांधी यांची म्हणता येईल. राहुल यांना एकच गोष्ट वारंवार खोटे सांगण्याची सवय जडली आहे आणि प्रत्येक निवडणुकीत ते पराभूत होत जातात आणि तरीही भाजपावर आरोपांच्या फैरी झाडत जातात, पण त्यांचा काहीही उपयोग होत नाही उलट लोकांमध्ये हसू मात्र होते. राहुल यांनी ताज्या आरोपांमध्ये भाजपावर अत्यंत गंभीर आरोप केले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की भाजपाने अलीकडच्या काही निवडणुकांत मोठा फ्रॉड केला आहे आणि त्याचा पर्दाफाश आपण करतो असा आव त्यांनी आणला आहे. पण निवडणूक आयोगाने परस्परच त्यांना चपराक दिली आणि त्यांचे आरोप किती खोटे आणि हास्यास्पद आहेत हे दाखवून दिले आहे. भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा यांनी राहुल यांना उत्तर दिले आहे आणि तेही त्यांच्याच शैलीत. त्यांनी म्हटले आहे की राहुल यांनी ज्या आपल्या ताज्या लेखात आरोप केले आहेत ते त्यांच्या फेक नरेटिव्ह म्हणजे खोट्या कहाणीचा लेखाजोखा आहे. त्यातून त्यांची येणाऱ्या बिहार निवडणुकीत काँग्रेस आणि त्यांच्या साथीदार पक्षांना कशी निराशा येणार आहे त्याचे द्योतक आहे. त्यांनी राहुल यांच्या प्रत्येक फेक नरेटिव्हची चिरफाड केली असून त्यांच्या प्रत्येक मुद्याला उत्तर दिले आहे.

काँग्रेस निवडणुकीमागून निवडणुकीत पराभूत होत आहे आणि दरवेळेस काँग्रेस पक्ष त्यांना जबाबदार धरण्याऐवजी तिसऱ्याच कुणाला तरी जबाबदार धरत असतो. हे भारतातील जनतेने अनेकवेळा पाहिले आहे. पण जे पी नड्डा यांचे जाऊ द्या. ते तर प्रतिस्पर्धी आहेत, पण खुद्द निवडणूक आयोगाने राहुल यांच्या आरोपांना बेबुनियाद म्हटले आहे आणि आयोग तर कुणाचाच गुलाम नाही. त्यामुळे त्याचे म्हणणे राहुल मान्य करणार की नाही हे महत्त्वाचे आहे. राहुल गांधी यांनी भाजपावर जे आरोप केले होते ते मॅच फिक्सिंगचे त्या आरोपांचे खुद्द आयोगानेच खंडन केले आहे. त्यांचे म्हणणे तरी राहुल मान्य करणार की नाही की हाही विरोधकांचा म्हणजे काँग्रेस विरोधकांची खेळी आहे असे म्हणणार असा प्रश्न आहे. राहुल गांधी यांच्याकडे लोकांना देण्यासाठी काहीही आकर्षक कार्यक्रम नाही आणि घोषणाही नाही. त्यांच्याकडे लोकांना आपल्याकडे टिकवून ठेवण्यासाठी काहीही योजना नाहीत. काँग्रेसकडे पैसा नाही. नेत्यांकडे प्रचंड पैसा आहे पण पक्षाकडे एक रुपयाही नाही. पक्षाच्या कार्यक्रमाची बिले भागवण्यासाठीही त्यांच्याकडे पैसा नाही. अशा परिस्थितीत राहुल भाजपावर आरोप करतात म्हणजे त्यांच्या धाडसाची कमालच आहे. मतदारांनी तुम्हाला मान्य नाही असा निकाल दिल्यावर त्याची विल्हेवाट मॅच फिक्सिंग करण्याच्या आरोपावरून करणे याला निवडणूक आयोगाने जोरदार खडसावले आहे. एका राष्ट्रीय दैनिकात राहुल यांनी लिहीलेल्या लेखात आपले नेहमीचे आरोप केले आणि त्यावर आयोगाकडून जोरदार प्रतिक्रिया उमटल्या. भारतीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे की महाराष्ट्राच्या मतदार याद्यांवर केलेले आरोप हे पूर्णपणे चुकीचे तर आहेतच पण कायद्याच्या राजवटीचा अपमान करणारे आहेत. काँग्रेस पक्षाला दिलेल्या उत्तरात आयोगाने वारंवार यावर उत्तर दिले होते आणि हे दस्तऐवज अजूनही आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत असेही सांगितले आहे. पण राहुल यांना ते पाहायचे नाही आणि उगीच आरोप करत सुटायचे अशी सवय लागली आहे. शिवाय ते युवराज असल्याने त्यांना कुणीही पक्षात विचारू शकत नाहीत असा त्यांचा समज आहे. निवडणूक आयोगाशी तडजोड झाली आहे असा आरोप करणे म्हणजे लाखो आयोगाच्या कर्मचाऱ्यांना खोटे ठरवण्याचा हा प्रयत्न आहे अशा शब्दात राहुल यांना आयोगाने फटकारले आहे. राहुल यांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडे लोकांना देण्यासारखे काहीही नाही आणि त्यामुळे खोटे बोलून स्वतःला खोटी सहानुभूती करण्याचे त्यांचे हे प्रयत्न आहेत. राहुल यांचा हरियाणात आधी पराभव झाला. त्यानंतर दिल्ली विधानसभा निवडणुकीत पराभव झाला. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आणि दरवेळी ते तीच तीच रेकॉर्ड वाजवत बसले आहेत त्यामुळे त्यांची आज जशी निवडणूक आयोगाने केली तशी गत बिहार विधानसभा निवडणुकीतही होणार आहे. पक्षाचे काम पाहावे, पक्षाला संजीवी द्यावी, पक्ष गतीमान पद्धतीने चालवाव तरच लोक काँग्रेसला मते देतील. पण ते सोडून राहुल केवळ भाजपावर खोटे आरोप करत बसले आहेत आणि त्याची परिणती त्यांच्या आणखी एका पराभवात होणार आहे हे निश्चित. राहुल यांचे हे फेक नरेटिव्ह सेट केल्याचे प्रकार पहिलेच नाहीत.

या अगोदरही राहुल यांनी हाच प्रकार केला होता आणि महाराष्ट्रात माती खाल्ली होती. कारण लोकांनीच त्यांना माती चारली होती. अजूनही राहुल हे नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्या काळात वावरत आहेत त्यांच्या काळात एकमेकांना दुसऱ्यांची खोटी भीती दाखवून चालत होते आणि लोक काँग्रेसला मते देत. पण आज तशी स्थिती नाही. आज सारी माध्यमे जागृत झाली आहेत आणि समाजमाध्यमे कधी नव्हे ती आज प्रगत आहेत त्यामुळे कुणाचेही कितीही खोटे लोकांबरोबर समजते. राहुल यांना ते समजत नाही हीच काँग्रेसची शोकांतिका आहे. पण राहुल यांच्या आरोपांमध्ये यापेक्षाही जास्त गंभीर आहे ते म्हणजे त्यांनी मोदी यांच्यावर टीका करताना पाकिस्तानची भाषा बोलली आहे. ती खरोखरच निषेधार्ह आहे. तसेच आता महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींचा अपमान केला आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे. राहुल आपल्याकडे लोकशाही आहे म्हणून इतके बोलू शकतात आणि आरोप करू शकतात. तरीही मोदी सरकार विरोधकांचा आवाज दाबून टाकत आहे असा आरोप करण्यास राहुल मोकळे होतात. आता राहुल यांना आयोगानेच परस्परच तंबी दिल्याने त्यांची काही दिवस तरी बकबक शांत राहील अशी आशा आहे.

# सकारात्मक ऊर्जेचे अखंड प्रेरणास्त्रोत...दाजी पणशीकर



हिंदू धर्म आणि अध्यात्म यांचे ज्येष्ठ विचारवंत, रामायण महाभारत यासारख्या सनातनी हिंदू धर्मग्रंथांचे व्यासंगी अभ्यासक आणि विश्लेषक तसेच भाष्यकार पंडित दाजी शास्त्री पणशीकर यांचे नुकतेच ठाणे येथील त्यांच्या मुक्कामी दुःखद निधन झाले. लौकिक अर्थाने जरी दाजी गेले असले तरी त्यांच्या दांडग्या व्यासंगाचा, अभ्यासाचा, अभ्यासू व्याख्यानांचा आणि सर्वसामान्य जनतेसाठी तसेच सर्वसामान्य जनतेला समजण्यासाठी क्लिष्ट असलेल्या संस्कृत भाषेतील अध्यात्मिक धार्मिक स्त्रोत श्लोक यांचा गूढ गर्भितार्थ स्वतःच्या सोप्या सुटसुटीत भाषेत सर्वसामान्यांना समजावून सांगणारे दाजी हे खऱ्या अर्थाने सामान्य माणसांसाठी पंडित आणि शास्त्रीच होते.

गोवा राज्यातील पेडणे या गावातील पणशीकर हे श्रीरवळनाथ भगवतीचे उपासक. वेदविद्या संगोपन व संवर्धन करणाऱ्या घराण्यात मुंबईत १ मे १९३४ रोजी दाजी यांचा जन्म झाला. त्यांचे बालपण आणि शालेय शिक्षण हे मुंबईतील ठाकूरद्वार परिसरात झाले. प्रकृती अस्वास्थ्य त्यामुळे त्यांना पुढील शिक्षण पूर्ण करता आले नाही मात्र त्यानंतर धार्मिक आणि विशेषतः सनातन हिंदू धर्मातील रामायण, महाभारत, आद्य शंकराचार्यांची स्तोत्रे, संतसाहित्य यांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. पेडण्यातील श्रीदेवीभगवती रवळनाथ पंचायनात पुराण सेवा पणशीकर घराण्याचे कर्तव्य होय.

वडिलांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे दाजींनी श्रीदेवीभगवती चरणी पुराण सेवा सुरू केल्यानंतरच त्यांना आपला जन्म व्याख्याने देण्यासाठी आहे असा बोध झाला. त्यामुळे दाजींनी व्याख्यान हे उपजीविकेचे माध्यम न समजता ते एक व्रत म्हणूनच केले. त्यामुळे लेखनापेक्षा व्याख्याने देण्यात दाजींना विशेष रस होता.

दाजींचे मूळ नाव नरहरी पणशीकर असे असले तरी प्रत्यक्षात ते साहित्यिक, सामाजिक आणि राजकीय वर्तुळात देखील दाजी पणशीकर या नावानेच अधिक ओळखले जात होते. मुंबईतील ठाकूरद्वार येथील रात्र शाळेत त्यांनी शिक्षण घेतले आणि त्यानंतर काही काळ ते पौरोहित्यामध्ये रमले. त्यानंतर त्यांनी रामायण महाभारत यामधील व्यक्तीरेखा सर्वसामान्य माणसांसमोर अधिक सुलभ मराठी भाषेत व्याख्यान यांच्या माध्यमातून उलगडून सांगण्यास सुरुवात केली. दाजी पणशीकर यांच्या या व्याख्यानांना महाराष्ट्राबरोबरच परदेशातील भारतीयांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. देश-विदेशात मिळून दाजींनी जवळपास अडीच हजारांहून अधिक व्याख्याने दिली. दाजींची ही व्याख्याने म्हणजे हिंदू धर्माच्या अभ्यासकांना एक मोठा प्रेरणास्त्रोत आहे. तसेच ज्यांना ज्यांना रामायण, महाभारत आणि त्याच्यातील व्यक्तिरेखा या व्यक्तिरेखांचा समग्रभ्यास अंतरंगाने समजून घ्यायचा आहे त्यांच्यासाठी दाजींची व्याख्याने आणि त्याचबरोबर दाजींनी यावर लिहिलेली विपुल ग्रंथसंपदा ही खरोखरच हिंदू धर्मासाठी, हिंदू धर्म ग्रंथांच्या अभ्यासकांसाठी मार्गदर्शनाचा चिरंतन असा वैचारिक अमूल्य ठेवा आहे.

दाजी पणशीकरांची ग्रंथसंपदा

महाभारत एक सुडाचा प्रवास, कर्ण खरा कोण होता? कथामृतम, कणिकनिती, अपरिचित रामायण पाच भाग, स्त्रोत्रगंगा दोन भाग, त्याचप्रमाणे गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्यावरील आदिशक्तीचा धन्योदगार अशा लोकप्रिय आणि गाजलेल्या ग्रंथसंपदेसह अनेक ग्रंथांच्या तीसहून अधिक आवृत्ती त्यांच्या प्रकाशित झाल्या आहे. सलग दोन दशके ते लेखन मालिकेच्या माध्यमातून पौराणिक हिंदू धर्मग्रंथांवर चिंतन, लेखन सातत्याने करत होते. अखंड सकारात्मक ऊर्जेचा अदृश्य स्त्रोत हा दाजी शास्त्रींच्या धमन्यांमधून रक्ताबरोबरच सातत्याने प्रवाहित होत असे. दाजींच्या मूळ स्वभावाचे हे वैशिष्ट म्हणावे लागेल की त्यांनी हा सकारात्मक ऊर्जेचा अखंड स्त्रोत हा सातत्याने त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाच्या हृदयामध्ये सातत्याने तेवत ठेवला. दाजींचे मूळ पणशीकर घराणेच हे स्वरस्वतीचा वरदहस्त प्राप्त करूनच आले आहे. पणजोबा पंडित वासुदेव शास्त्री पणशीकर हे तब्बल ५०वर्षांहून अधिक काळ निर्णय सागर प्रकाशनाचे प्रधान संपादक होते. संस्कृत आणि मराठी भाषेत मिळून शंभरहून अधिक स्वसंशोधित पुस्तके वासुदेवशास्त्री पणशीकरांनी प्रकाशित केली आहे आणि जगभर त्यांचा अभ्यास केला जातो. व्याकरणाचार्य विष्णुशास्त्री पणशीकर हे दाजींचे वडील मुंबईतील ठाकूरद्वार येथील काळाराम मंदिरात विष्णुशास्त्री वेदपाठ शाळा चालवत असत. दाजींचे वेदा अध्ययन येथेच झाले. अर्थात दाजींच्या आयुष्यामध्ये जी कलाटणी मिळाली ती विमांसा तीर्थ श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांच्या माध्यमातून. नात्याने श्रीपादशास्त्री हे दाजींचे मामा होते मात्र त्याचबरोबर ते दाजींचे गुरू देखील होते. त्यांच्या घरीच राहून दाजींनी शिक्षणाचे धडे घेतले. दाजी नेहमी असं म्हणायचे की नानांनी मला काही शिकवले नाही, मात्र माझ्यातील अहंकार नष्ट करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले आणि हेच सर्वात महत्त्वाचे आहे.

रामायण, महाभारत, आद्य शंकराचार्य कृत संस्कृत स्तोत्रांचे मराठीतून विश्लेषण, संत साहित्याचा समग्र व्यासंग आणि त्याचबरोबर समाजाला सातत्याने नवनवीन देत राहण्याची उपजत आणि अनोखी उर्मी हे दाजींच्या स्वभावाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. दाजींना सातत्याने नाविन्याचा ध्यास असायचा. कोणताही नवीन उपक्रम असो किंवा कोणतीही नवीन योजना असो, कोणताही नवीन संकल्प असो तो दाजींकडे नेला की ते काम तडीस कसे जाईल आणि यशस्वी कसे होईल यासाठी दाजी त्या कामांमध्ये स्वतःला पूर्णपणे झोकून द्यायचे. ज्येष्ठ दिवंगत अभिनेते व दाजींचे मोठे बंधू प्रभाकरपंत पणशीकर यांच्या नाट्यसंपदा संस्थेचे दाजी हे प्रमुख व्यवस्थापक होते. त्यामुळे मराठी रंगभूमीशी आणि रंगकर्मींशी दाजींचा निकटचा संबंध आला.

शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे ते निकटवर्तीय तर होतेच. मात्र त्याचबरोबर शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख स्वर्गीय आनंद दिघे तसेच माजी कामगार मंत्री व अंबरनाथचे शिवसेनेचे आमदार स्वर्गीय साबिरभाई शेख यांच्याशी देखील दाजी यांचे स्नेहबंध घट्ट होते. त्यामुळेच सामाजिक कार्यात देखील दाजींचा सहभाग हा भल्याभल्यांना आश्चर्याचा धक्का देणारा ठरत असे. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांनी चांगल्या चांगल्या संस्थांची निर्मिती तर केलीच मात्र या संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्य कशी सुरू राहतील आणि समाजाला विधायक कार्याची दिशा कशी मिळेल यासाठी देखील दाजींनी अखेरपर्यंत प्रयत्न केले. गेल्या २८ एप्रिल रोजी देखील दाजींनी ठाण्यातील पाचपाखाडी येथील ज्ञानराज सभागृहात दोन तासांचे अखंड व्याख्यान दिले.

वयाची ९२ वर्षे गाठलेले मात्र मनाने आणि ऊर्जेने चिरतरुण राहिलेले दाजी पाण्याचा थेंबही तोंडात न पिता दोन तास अखंड व्याख्यान देतात हाच त्यांना सरस्वतीने दिलेला मोठा वरदहस्त म्हणावा लागेल. अगदी शुक्रवारी देखील ज्या दिवशी त्यांचे दुःखद निधन झाले त्या दिवशी सकाळी त्यांनी ग्रंथदूत या पुस्तकावर रवीप्रकाश कुलकर्णी यांनी लिहिलेल्या लेखावर दाजींचे चिंतन सुरू होते. ग्रंथ प्रसारासाठी पडद्यामागून जी अनेक मंडळी अखंड परिश्रम घेत असतात त्यावर ग्रंथदूत हे पुस्तक प्रकाशित आहे. दाजींनी हा लेख वाचला आणि तत्काळ त्यांनी आपण सर्व ग्रंथदूतांचा एक मोठा सन्मान सोहळा आयोजित करून त्यामध्ये या ग्रंथदूतांचा सत्कार केला पाहिजे असे मत त्यांनी मांडले. केवळ मत मांडून ते शांत बसले नाहीत तर त्यांनी त्या दृष्टीने तयारी देखील सुरू केली होती. तथापि त्याच दिवशी संध्याकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.



# कोथिंबीरचा रस किडनीसाठी फायदेशीर ठरू शकतो



आजकालच्या चुकीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे मूत्रपिंडाच्या समस्या सामान्य होत आहेत. जर तुम्हाला तुमचे मूत्रपिंड निरोगी राहायचे असेल तर हिरव्या धणे रस हा एक सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय असू शकतो.कोथिंबीर मध्ये असलेले डिटॉक्सिफायिंग गुणधर्म शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास मदत करतात. तसेच, त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि फायबर मूत्रपिंड आणि मूत्रमार्ग मजबूत करतात. चला त्याचे फायदे आणि त्याचे सेवन करण्याची योग्य पद्धत जाणून घेऊया. कोथिंबीरचा रस मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे कारण त्यात अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे मूत्रपिंडातील दगड आणि इतर समस्या टाळतात. तसेच, हा रस शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे मूत्रपिंडांवरील दबाव कमी होतो आणि त्यांना चांगले कार्य करण्यास मदत होते.**कोथिंबीरचा रस पिण्याचे इतर फायदे**

पचनसंस्था: कोथिंबीरचा रस पचनसंस्था सुधारण्यास मदत करतो, ज्यामुळे शरीराला पोषक तत्वे शोषण्यास मदत होते.

रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: हिरव्या धण्यांचा रस केवळ मूत्रपिंडाचे आरोग्य सुधारत नाही तर रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करतो. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि मूत्रपिंडाच्या संसर्गाचा धोका कमी करतात. यूटीआयमध्ये आराम मिळतो: कोथिंबीरच्या रसामध्ये आढळणारे अँटीबॅक्टेरियल गुणधर्म यूटीआय (मूत्रमार्गाचा संसर्ग) रोखतात आणि मूत्रपिंड निरोगी ठेवण्यास मदत करतात. नियमित सेवनाने यूटीआय आणि मूत्रपिंडाच्या संसर्गाची शक्यता कमी होते.

**कोथिंबीरचा रस कसा प्यावा**

कोथिंबीरचा रस तयार करण्यासाठी, प्रथम ताजी कोथिंबीरची पाने पूर्णपणे धुवा जेणेकरून त्यावरील घाण किंवा कीटकनाशके निघून जातील. त्यानंतर, ही पाने मिक्सरमध्ये थोडे पाणी घालून बारीक करा. पाने चांगली बारीक झाल्यावर, मिश्रण गाळून त्याचा रस काढा. तुम्ही सकाळी हा रस पिऊ शकता. कोथिंबीरचा रस नियमितपणे पिल्याने किडनीचे आरोग्य सुधारते आणि शरीरातील विषारी पदार्थ देखील बाहेर पडतात.

# भारतातील पहिली महिला बाऊन्सर

२९ मे रोजी खडकवासल्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमधून १७ मुलींची पहिली तुकडी खडतर लष्करी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडली. आज असं कोणतंही क्षेत्र नाही जिथे महिलांचा वावर नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने महिला यशाचं शिखर काबिज करत आहेत. महत्त्वाचे नेते, अभिनेते, सेलेब्रिटी यांच्या भोवती आपण एक सुरक्षा 'कडे' पाहतो. यांमध्ये बहुतांश पुरुषांचा समावेश असतो. सुरक्षा करणे ही महिलांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे असा एक समज होता. या समजेला तिने छेद दिला. ती भारतातील पहिली महिला बाऊन्सर बनली, ती महिला 'रक्षक' म्हणजे मेहरुन्निसा शौकत अली.



मेहरुन्निसाचा जन्म उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील एका मुस्लीम रूढीवादी पारंपरिक कुटुंबात झाला. ती अशा कुटुंबात वाढली जिथे मुलींना घराबाहेर पडण्याची पथक रवानगी नव्हती. तिच्या अब्बान्ना असा विश्वास होता की शिक्षणामुळे मुली बिघडतात. मेहरुन्निसाला मात्र शिक्षण घ्यायचे होते. सैन्यात भरती होण्याचे किंवा पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न लहानपणापासून तिने पाहिले होते. बालपणात, तिच्या शिक्षणाची आणि शिकण्याची इच्छा कळल्यानंतर तिच्या वडिलांनी वीज बंद केली आणि पुस्तके जाळण्याचा प्रयत्नही केला. मेहरून्निसाला तिच्या आईचा एकमेव आधार होता.

मेहरुन्निसाला तीन बहिणी होत्या. या साऱ्या बहिणी शिक्षण घेत असतानाच त्यांच्या वडिलांनी त्यांच्या मोठ्या बहिणीचे लग्न केले. आता मेहरुन्निसाची पाळी होती. वयाच्या १२ व्या वर्षी मेहरुन्निसाच्या वडिलांनी तिच्यासाठी मुलगा शोधण्यास सुरुवात केली. मेहरुन्निसाचे लग्न होणार होते, परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते. तिला टायफॉइड झाला आणि काही काळ तिने अंथरुणावर झोपून घालवला. आजारपणानंतर तिला स्वतःचे जीवन चांगले बनवण्याची प्रेरणा मिळाली. दरम्यान मेहरुन्निसाच्या आईने, मेहरुन्निसाच्या वडिलांना आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी राजी केले.मेहरुन्निसाने एनसीसी कॅडेट म्हणून प्रवेश केला कारण तिला नेहमीच पोलीस अधिकारी म्हणून काम करायचे होते. तिने पोलिसात नोकरी मिळविण्यासाठी फिटनेस आणि कराटेचे प्रशिक्षण घेतले. जेव्हा तिला कळले की दिल्लीला महिला बाऊन्सरची आवश्यकता आहे, तेव्हा तिने अर्ज केला. तिची महिला बाऊन्सर म्हणून निवड झाली.

जेव्हा मेहरुन्निसाला कामात अडचणी आल्या तेव्हा तिचा संघर्ष पुन्हा सुरू झाला. तिने नमूद केले की, त्यावेळी बाऊन्सरऐवजी महिला सुरक्षा रक्षक हा शब्द वापरला जात होता. पुरुष बाऊन्सरना मान मिळत असे, तर महिला बाऊन्सरना भेदभाव सहन करावा लागला. मेहरुन्निसावर वाईट टीका आणि शेरेबाजी केली जायची; परंतु तिने हळूहळू तिच्या कामाने, ताकदीने आणि शिक्षणाने या क्षेत्रात तिच्या विरोधात असलेल्या प्रत्येकाला चांगले उत्तर दिले. २००४ मध्ये 'इंडियन आयडॉल' टीमच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, मेहरुन्निसाचे आयुष्य पूर्णपणे बदलले. एक महिला बाऊन्सर म्हणून तिला लोक ओळखू लागले. समाजात तिला मान मिळू लागला. मेहरुन्निसा आता मर्दानी बाऊन्सर्स आणि डॉल्फिन सिक्युरिटी सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी चालवत आहे. तिने अमिताभ बच्चन, प्रियांका चोप्रा, राणी मुखर्जी, रणबीर कपूर आणि दीपिका पदुकोण यांच्यासह अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींना सुरक्षा प्रदान केली आहे. मेहरुन्निसा शौकत अली ही देशातील पहिली महिला बाऊन्सर आहे. मेहरुन्निसा दिल्लीतील हौज खास गावातील सोशल नावाच्या लोकप्रिय कॅफेमध्ये काम करते. खासगी कार्यक्रमांसाठी आणि प्रसिद्ध लोकांसाठी, ज्यात बॉलिवूडमधील आघाडीच्या सेलिब्रिटींचा समावेश आहे, त्यांना ती संरक्षण देते. ती पबमधील भांडणे सोडवण्यात, बेकायदेशीर ड्रग्ज ओळखण्यात आणि महिला ग्राहकांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवण्यात तज्ज्ञ आहे. नेहमीच असे मानले गेले की, महिला स्वतःचे संरक्षण करू शकत नाहीत. त्यांना पुरुषाची गरज आहे. तथापि, या सर्व रूढीवादी विचारसरणीला मोडून काढत मेहरुन्निसाने हे सिद्ध केले आहे की, महिला स्वतःचे संरक्षण करू शकतात आणि इतरांनाही सुरक्षा प्रदान करू शकतात. मेहरुन्निसाच्या कुटुंबाची विचारसरणीही बदलली आहे आणि समाजही त्यांच्याकडे आदराने पाहतो. मेहरुन्निसाने बाऊन्सर म्हणून काम करणे ही देखील आदराची बाब आहे. इतर महिलांनीही या क्षेत्रात नोकरी करावी अशी तिची इच्छा आहे. कोणत्याही नवीन क्षेत्रात काम करताना अडचणी येणार. प्रस्थापित व्यवस्था सहज स्वीकार करत नाही. अशा वेळी न डगमगता पाय घट्टपणे रोवून उभं राहणे महत्त्वाचे. मेहरुन्निसा खंबीरपणे उभी राहिली. देशातील पहिली महिला बाऊन्सर म्हणून उदयास आली. तिच्यामुळे हे क्षेत्र महिलांसाठी खुले झाले. खऱ्या अर्थाने मेहरुन्निसा लेडी बॉस आहे.

# निसर्ग फाऊंडेशनची लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी शासनाकडून निवड

**बीड (प्रतिनिधी):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनद्वारा लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक सेवाभावी संस्थाना राज्य शासनाच्या वतीने हा प्रतिष्ठित पुरस्कार दिला जातो. बीड तालुक्याच्या येळब (घाट) वेथील निसर्ग फाउंडेशन या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेला लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सन २०२३-२४ सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कारासाठी निवड झाली आहे.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन द्वारा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई द्वारा आयोजित लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी सकाळी ठिक ९.०० वा. मंत्रालय विस्तारित इमारत, मादाम कामा रोड, नरिमन पॉईट, मुंबई- ४०००३२ येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय विभागाच्या व राज्यमंत्री माधुरी मिसाळ, लोकसभा सदस्य अरविंद सावंत आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे. बीड तालुक्याच्या येळंब (घाट) येथील निसर्ग फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने पर्यावरण, नद्याची स्वच्छता अभियान, प्लॅस्टिक मुक्त गाव शहर जनजागृती प्रचार आणि प्रसार, व्यसनमुक्त भारत अभियान, बालविवाह रोखण्यासाठी जनचळवळ आदीसह विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याबद्दल या सामाजिक संस्थेला हा पुरस्कार देण्यात येत आहे. शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने दरवर्षी सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुरस्कार वितरण सोहळ्याचे निमंत्रणपत्र समाज कल्याण विभाग बीडचे कार्यालयीन अधीक्षक श्रीकांत घुले, समतादूत बार्टी पुणे, नाना गव्हाणे, समाजसेवक बीड संतोष निकाळजे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजित वैश्य, काळजीवाहक छाया सरोदे यांच्या उपस्थितीत निसर्ग फाऊंडेशन वेळंब (घाट) चे अध्यक्ष राजु बंजारे, सचिव यश वंजारे यांना देण्यात आले.

## विशेष वृत्त

## गेवराई शिक्षण विस्तार अधिकारीपदी भीमाशंकर नांदुरकर कार्यालयात रुजू

**गेवराई:** अंबाजोगाई येथील पंचायत समिती शिक्षण विभागातील शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर नांदूरकर हे गेवराई पंचायत समिती अंतर्गत गटशिक्षण कार्यालयात जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून १ जून २०२५ रोजी रूजू झाले आहेत.



नांदुरकर यांची प्रथम नेमणूक पंचायत समिती बीड येथे १६ ऑक्टोबर २०१३ रोजी झाली' असून जून २०१४ पर्यंत त्यांनी पंचायत समिती बीड येथे उत्कृष्टरित्या सेवा केलेली आहे. जून २०१४ मध्ये प्रशासकीय बदलीने त्यांची नियुक्ती पंचायत समिती पाटोदा येथे झाली. त्या ठिकाणी त्यांनी मे २०२२ पर्यंत उत्कृष्टरित्या सेवा केल्यानंतर विनंती बदलीने २४ मे २०२२ रोजी पंचायत समिती अंबाजोगाई येथे रुजू झाले. त्या ठिकाणी तीन वर्ष म्हणजेच ३१ मे २०२५ पर्यंत सेवा करून पुन्हा विनंती बदलीने पंचायत समिती गेवराई येथील शिक्षण विभागात जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारीपदी दिनांक १ जून २०२५ रोजी रुजू झाले आहेत. नांदुरकर यांनी १ डिसेंबर २००८ ते मार्च २०१० पर्यंत तसेच ऑक्टोबर २०१४ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून पंचायत समिती वडवणी येथे उत्कृष्ट काम केलेले आहे. सप्टेंबर २०१७ ते ऑक्टोबर २०१८ या कालावधीत पंचायत समिती माजलगाव येथे प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणूनही त्यांनी सेवा बजावलेली आहे. गेवराई पंचायत समिती अंतर्गत गटशिक्षण कार्यालयात आपण अनुभवाच्या जोरावर मेहनतीने काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## वट पौर्णिमेला सर्पराज्ञीत वृक्षोत्सव

**शिरूरः** तालुक्यातील तागडगाव येथील सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्र येथे सर्पराज्ञीचे मार्गदर्शक क्षितिज हिर्लेकर यांच्या संकल्पनेतून उद्या दि. १० जून रोजी वटपौर्णिमेनिमित्त आलेले आहे. या कार्यक्रमात निर्मिती केली जाणार आहे. मंगळवारी सकाळी ११.३० वाजता डॉ. अर्चना देशपांडे व डॉ. गणेश देशपांडे यांच्या हस्ते फायकस वनांची निर्मिती केली जाणार आहे. या फायकस वनामध्ये विविध वडांच्या प्रजातींची लागवड केली जाणार आहे. यामुळे पर्यावरण संतुलनाबरोबर विविध प्रजातींच्या वडांच्या वृक्षांची ओळख निसर्गप्रेमी होईल तसेच दुर्मिळ होत चाललेल्या वडांच्या प्रजातीचे संरक्षण संवर्धन आणि जतन होईल अशी माहिती सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी दिली.

## भाजपा पश्चिम मंडळाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा



**गेवराई :** भारतीय जनता पार्टी पश्चिम मंडळाच्या वतीने मादळमोही येथील श्री क्षेत्र विठ्ठलगडावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वड, लिंब, गुलमोहर, करंजी या सारखी सावली व ऑक्सिजन देणारी समाजोपयोगी झाडे लावण्यात आली. यावेळी भाजपाचे गेवराई विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप, भाजपा पश्चिम मंडळाचे तालुकाध्यक्ष ॲड.उध्दव रासकर, अभियानाचे संयोजक मच्छिंद्र यादव, भाजपाचे युवानेते संदीप आंधळे, सुशील भोपळे, आदिनाथ गावडे, भाजपाच्या अल्पसंख्याक मोर्चाचे अलीम शेख, अशफाक शेख, गुलजार शेख यांच्यासह कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.

## गोविंदवाडीमध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सिमेंट बेंच भेट

**गेवराई :** तालुक्यातील तलवाडा नजिक असलेल्या गोविंदवाडी येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त जयंतीचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते राजेश पेजगुडे, राहुल मराठे यांच्यावतीने गावातील नागरिकांना बसण्यासाठी सिमेंट बेंच भेट देण्यात आले. यावेळी सर्वप्रथम राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाचे ह.भ.प. सुरेशानंद महाराज, व्याख्याते चांभारे, माणिकराव राऊत, पंचायत समिती सदस्य शाम कुंड, माऊली महाराज जाधव, रुद्रेश्वर अर्बनचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ जाधव, माजी उपसभापती डॉ. आसाराम मराठे सरपंच कल्पना मराठे, देवराव बिचकुले अण्णासाहेब मोरे, कारभारी बिचकुले, नितीन पेजगुडे, महादेव शिंगाडे, दत्ता झणझणे, सुशील गिरी, कृष्णा शेंडगे, दत्ता शेंडगे, तुकाराम नरवडे, दिग्विजय मराठे, सुशील नवले, अनिल मोरे, अमर मराठे, विठ्ठल पेजगुडे, भैय्या बिचकुले, शलिकराम बिचकुले, धोंडीराम कहे, शरद जगदाळे, पांडुरंग गायकवाड, लक्ष्मण शिंगाडे, चंद्रकांत बिचकुले, गंगाराम नवले, महादेव बिचकुले, विष्णू शिंगाडेसह आदी ग्रामस्थ व राजेश पेजगुडे मित्रमंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## दिव्यांगांसाठी होमिओपॅथिक शिबिराचे आयोजन

**बीडः** आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, बीड आणि झीशवळलींळींश कोशेरीहिं, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ जून २०२५ रोजी सकाळी ८ वाजेपासून एक विशेष दिव्यांग होमिओपॅथिक चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मतिमंदता, गतिमंदता, उशीश-लीरश्र रिश्री, मूकबधिरपणा, झटके व इतर असाध्य आजार असलेल्या लहान मुलांवर सखोल होमिओपॅथिक मूल्यांकन करून उपचार केले जातात. ही संकल्पना जगप्रसिद्ध होमिओपॅथ डॉ. प्रफुल्ल विजयकर यांच्या वैचारिक नेतृत्वातून २००९ साली सुरु झाली. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून आजवर ५ हजार हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. या शिबिराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांनी मुळी ९५०३८७५३११ यांच्याशी संपर्क करून नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे.

## जन शिक्षण संस्थानमध्ये पर्यावरण दिन उत्साहात

**बीड (प्रतिनिधी):-** कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने चक्रधर नगर पांगरी रोड बीड येथे सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी, संचालक श्री गंगाधर जी देशमुख, कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनूरकर यांच्यासह जन शिक्षण संस्थान व दीनदयाल शोध संस्थान, गोकुळ शिशु वाटिका, नानाजी देशमुख विद्यामंदिर चे सर्व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. लोकसंख्येच्या वाढीबरोबरच अनेक समस्या वाढत आहेत. त्यातीलच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास व त्याचे मानवी आरोग्यावर होणारे वाईट परिणाम. हे टाळण्यासाठी वृक्ष लागवड व संवर्धन करणे आवश्यक असल्याचे श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी या म्हणाल्या. तसेच प्लास्टिकच्या अतिवापरामुळे सुद्धा अनेक समस्या उद्भवू लागल्या आहेत त्याला पर्याय म्हणून आपण कापडी बॅग वापरून प्लास्टिकचा वापर टाळू शकतो असे संचालक गंगाधर देशमुख म्हणाले.

## बीड जिल्हातील पहिली रोटरी सायक्लोथॉन यशस्वी

**बीड (प्रतिनिधी):-** ३ जून जागतिक सायकल दिवस व ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून बीडमध्ये आरोग्याची चळवळ सुरु राहण्याकरता रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउन यांच्यावतीने सायक्लोथनचे आयोजन केले होते. यामध्ये १२० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. ५, २५ व ५० किलोमीटर अशा तीन कॅटेगिरीमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. बीडच्या इतिहासामध्ये या स्पर्धेचे पहिल्याच वेळेस रोटरीने आयोजन केले त्याबद्दल सर्व स्पर्धकांनी नागरिकांनी आभार व्यक्त केले.




५ किलोमीटरमध्ये ६०, २५ किलोमीटरमध्ये ४३ व ५० किलोमीटरमध्ये ३४ जणांचा सहभाग होता. महाराष्ट्र सायकल असोसिएशनच्या परवानगीने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातुरे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, हरीश मोटवानी, वाहतूक शाखेचे सुभाष सानप, जाधवर यांच्या हस्ते झेंडा दाखवून व हवेत फुगे सोडून झाले. २५ किमी पुरुष गटामध्ये प्रथम नरेंद्र गंगाधर सोमवंशी, (लातूर), द्वितीय उदय टिमेकर (आहिल्यानगर), तृतीय शेख खुदरूस शेख बसीर (परभणी) तर महिला गटामध्ये प्रथम राजनंदिनी गंगाधर सोमवंशी, द्वितीय झीनत आयुब सय्यद, तृतीय अश्विनी संकेत लहाने (संभाजीनगर) व ५० किमीमध्ये प्रथम सिध्देश अजीत पाटील (कोल्हापूर), द्वितीय हनुमान, तृतीय रेहान इब्राहीम शेख यांनी बक्षिस जिंकले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नितीन गोपन, सचिव डॉ. निलेश जगदाळे, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. प्रकाश कोंका व सर्व रोटरी सदस्यांनी तसेच योगा ग्रुपचे फार मोठे सहकार्य लाभले. राजेश बंब, दिनेश लोळगे, चंद्रप्रकाश सेठी, जनार्दन दहिवाळ, डॉ. निलेश जगदाळे, व्यंकटेश सायकलचे गोटू संचेती, इंजि. नितीन गोपन यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धे साठी ऑब्झर्वर म्हणून अहमदनगर येथून संभाजी मोहिते व पंच म्हणून ॲड. बाळासाहेब माने यांनी काम केले.

## पेठ बीडमधील भाविकांना चाकरवाडीत शिवकथेला जाण्यासाठी वाहतूक सेवा

### राणा रणजितसिंह चौव्हाण यांचा पुढाकार

**बीड (प्रतिनिधी):-** बीडच्या पावनभुमीत आंतरराष्ट्रीय शिवकथाकार श्री पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवकथेचे आयोजन केलेले आहे. जिल्ह्यासह मराठवाड्यातून भाविक शिवकथा श्रवण करण्यासाठी येणार आहेत. कै. रणजितसिंह (भाऊ) चौव्हाण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पेठ बीड भागातील भाविकांसाठी राणा रणजितसिंह चौव्हाण यांच्या पुढाकाराने वाहनसेवेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी व्यापारी बांधव, ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत प्रस्थान करण्यात आले.



श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ८ जूनपासून शिवकथेला सुरुवात झाली. यावेळी लाखो भाविक विविध ठिकाणाहून बीडमध्ये दाखल झाले. अशावेळी अनेक भाविकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता कै. रणजितसिंह (भाऊ) चौव्हाण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नगरसेवक राणा रणजितसिंह चौव्हाण यांनी पेठ बीड भागातील भाविकांसाठी हिरालाल चौक ते चाकरवाडी जाण्या-येण्यासाठी वाहन उपलब्ध करत भाविकांची होणारी गैरसोय टाळली. सोमवार दि.८ जून रोजी सकाळी १० वाजता त्या सेवेचे बीड येथून हिरालाल चौक येथील व्यापारी बांधव, महिला भाविक यांच्या हस्ते महादेवाचे पूजन करून चाकरवाडीकडे प्रस्थान झाले. ही वाहतूक सेवा पुढील सात दिवस असणार आहे. रोज सकाळी १० वाजता हिरालाल चौक येथे उपलब्ध असेल. याप्रसंगी आयोजक राणा रणजितसिंह चौव्हाण, शांतीलाल समदरिया, माजी नगरसेवक बाबूराव परळकर, प्रकाश कानगावकर, देवा नलावडे, सुरेश असलेकर, भालचंद्र मिटकरी, मुकेश शिवगण, कुणाल चव्हाण, विक्रम चव्हाण, सुरेश बनसोडे, सत्यवान वारे यांच्यासह सर्व मित्र परिवार, महिला भगिनी उपस्थित होते.

## बीडमध्ये वामा लढाई सन्मानाची चित्रपटाला पत्रकारांचा प्रतिसाद

**बीड (प्रतिनिधी):-** तेलगू, हिंदी, अवधी, भोजपुरी अशा इतर चार भाषांमधील नऊ हिट चित्रपटांनंतर आपल्या भूमिपुत्राच्या मराठी सिनेसृष्टीतील पहिलाच मराठी चित्रपट 'वामा लढाई सन्मानाची' संपूर्ण महाराष्ट्रात मागील ३ आठवड्यांपासून हाऊसफुल सुरु आहे. बीडकरांनी देखील आपल्या भूमिपुत्राच्या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद दिला. ८ जून २०२५ रोजी बीड मधील समस्त पत्रकार बांधवांसाठी वामा लढाई सन्मानाची स्पेशल शो चे आयोजन करण्यात आले होते. या चित्रपटास पत्रकारांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यावेळी पत्रकार वैभव स्वामी, एस.एम युसुफ, आत्माराम वाव्हळ, डॉ. संजय तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी भागवत वैद्य, अभिजीत नखाते, शिवप्रसाद सिरसाट, रईस खान, राजू वंजारे आदीसह पत्रकार व महिला उपस्थित होत्या.



## एअरटेल टॉवरच्या केबलची चोरी

**केज (प्रतिनिधी):** तालुक्यातील शिरूर घाट येथील एअरटेल टॉवरचे दहा हजार रुपये किमतीचे पॉवर केबल अज्ञाताने चोरून नेले. ही घटना समोर आल्यानंतर निसा सेक्युरिटी कंपनीचे सुपरवायझर परमेश्वर सुधाकर राख यांनी केज ठाण्यात फिर्याद नोंदवली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द केज ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस पुढील तपास करत आहेत. दरम्यान केज तालुक्यात गेल्या काही दिवसापासून चोऱ्यांचे प्रमाणात वाढ होत असल्याने पोलीसांनी अधिकची गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे.

## बीड तालुक्यात खरीप पेरणीपूर्व मशागतीला वेग

**पिंपळनेर (प्रतिनिधी):** पावसाने उघडीप दिल्याने बीड तालुक्यात सध्या खरीप हंगामासाठी शेतकरी तयारीला लागला आहे. पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग आला असून, या हंगाम नियोजनाच्या चिंतेने शेतकऱ्यांना ग्रासले आहे. दरम्यान सध्या शेतकरी बी-बियाणे खरेदीसाठी नियोजन करत असून आता शेतकऱ्यांची बीडमधील मोंढ्यात लगबग पहायला मिळत आहे.

खरीप हंगामापूर्वीच्या शेतीमशागतीचे काम सध्या वेगात सुरू झाली आहेत; मात्र ऐन खरिपाच्या तोंडावर बळीराजासमोर समस्यांचा डोंगर उभा राहिला आहे. गेल्या हंगामात बियाणे, खते, औषधांच्या दरवाढीची झळ शेतकऱ्यांना बसली होती. या हंगामातही खर्चवाढीचे संकेत असल्याने या हंगामातही उत्पन्नवाढी ऐवजी मजुरीसह खर्चवाढीचीच धास्ती शेतकऱ्यांमध्ये दिसत आहे. तालुक्यातील पिंपळनेर परिसरातील नाथापूर, जवळा, ईट, घाटसावळी, नाळवंडी, नागापूर आदी बहुतांश भागात सध्या खरीप हंगामाची तयारी शेतकऱ्यांनी हाती घेतल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शेतीची पेरणीपूर्व मशागत करणे हाच विषय असला तरी खते, बी-बियाणे, मजूर शेती पूर्वीसारखी राहिली नाही. पीक घरात येईपर्यंत नाही, तर बाजारात विक्री होईपर्यंत नफा मिळेल याची शास्वती राहिली नाही. सरकारी घोषणांची अमलबजावणी ही अतिशय धीम्या गतीने होते. त्यामुळे पेरणीचा किंवा पिकांना खते देण्याचा कालावधी निघून गेल्यावर मिळणाऱ्या मदतीला अर्थ उरत नाही. यासाठी अगोदर पैशांची व्यवस्था करावी लागते. अवकाळीच्या नुकसानीची भरपाई तत्काळ शेतकऱ्यांच्या पदरात पडली तर कुठं खरीप हंगामाच्या तयारीला हातभार लागेल, नैसर्गिक आपत्ती समोर कांदा टिकला नाही. राहिलेल्या कांद्याला भाव नाही. रब्बीमध्ये गहू, कांद्याने शेतकऱ्यांचे वाटोळे झाले आहे. फळबागांच्या नुकसानीकडे शासनाने दुर्लक्ष केले. खरिपातील नियोजन होतांना शेतकर्यांचे आता कपाशीकडे लक्ष लागले आहे अशी प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत.



# तुळजापूर,अक्कलकोट मंदिरात ना.पंकजाताई मुंडे यांचे 'नो प्लास्टीक' अभियान

## मंदिर परिसरातील प्लास्टीक कचरा स्वतः उचलून नागरिकांना दिला संदेश







सोलापूर (सरकार) राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज श्रीक्षेत्र तुळजापूर व अक्कलकोट मंदिरात आज 'नो प्लास्टीक' अभियान यशस्वीपणे राबवले मंदिर परिसरातील प्लास्टीकचा कचरा स्वतः उचलून त्यांनी नागरिकांना प्लास्टीकमुक्तीचा संदेश दिला. एकल प्लास्टीकचा पुनर्वापर रोखण्याचे आवाहनही त्यानी यावेळी केले.

ना. पंकजाताई मुंडे आज श्रीक्षेत्र तुळजापूर, अक्कलकोट व गाणगापूर च्या दौर्यावर होत्या. दुपारी तुळजापूर येथे पोचल्यावर त्यांनी तुळजाभवानी मातेची खण नारळाने ओटी भरून दर्शन घेतले. भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, मंदिर समितीचे विश्वस्त यावेळी उपस्थित होते.

देवीचे दर्शन झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी परिसरातील प्लास्टीकचा कचरा स्वतः उचलला, त्यांच्या या कृतीने उपस्थित भाविकांनी देखील पुढे येवून योगदान दिले. मंदिराच्या बाहेर असलेल्या दुकानांना भेटी देऊन त्यांना प्लास्टीक पिशव्यांचा वापर न करण्याचे आवाहन केले याशिवाय उपस्थित भाविकांना तसेच दुकानदारांना त्यांनी कापडी पिशव्यांचे वाटप केले. मंदिर समितीच्या वतीने कार्यालयात त्यांचा याप्रसंगी हृद्य सत्कार करण्यात आला.

ना. पंकजाताईंनी अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ व गाणगापूर येथे श्री दत्तात्रयांचे दर्शन घेतले. याठिकाणी भाविकांना मार्गदर्शन करताना त्यांनी एकल प्लास्टीकचा पुनर्वापर रोखण्याचे आवाहन केले. प्लास्टीकची समस्या सध्या गंभीर बनली आहे, प्लास्टीक पिशव्या हया पर्यावरणाला अतिशय घातक आहेत, त्याचा वापर करू नये. प्लास्टीक ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा असं आवाहन त्यांनी केलं.

# महायुती सरकारच्या फसव्या योजना जनतेसमोर उघड करा–आ.कैलास पाटील



बीड (सरकार): शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कळंब धाराशिव चे आमदार मा. कैलास पाटील यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. महायुती सरकारच्या निवडणुकी पूर्वी दिलेल्या फसव्या योजना, आश्वासने या विरोधात 'क्या हुवा तेरा वादा' या अनोख्या आंदोलना विषयी चर्चा केली.

महायुती सरकार स्थापने पूर्वी ज्या फसव्या योजना, आश्वासने जाहीर केली ती प्रखरतेने जनतेसमोर मांडा, गाव तांडा वस्ती वर जाऊन या सरकारचा खरा चेहरा जनतेला दाखवा असे आमदार कैलास पाटील म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसैनिकांशी संवाद साधला.

यावेळी त्यांचा सत्कार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला, सोबत उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, राजु माहुवाले, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, युवासेनेचे बबलु दिवे, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे, पंकज कुटे, गणेश लोणकर, सतीश परदेशीं, मारुती वाघचौरे अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर, नंदकुमार घोगरे, विशाल तांबे सह आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेठ बीड मधील भाविकांसाठी शिवकथेस जाण्याकरिता हिरालाल चौक ते चाकरवाडी वाहतूक सेवा

बीड (सरकार)बीडच्या पावनभुमीत आंतरराष्ट्रीय शिवकथाकार श्री पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवकथेचे आयोजन केलेले आहे. जिल्ह्यासह मराठवाड्यातून भाविक शिवकथा श्रवण करण्यासाठी येणार आहेत. कै.रणजितसिंह (भाऊ) चौव्हाण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पेठ बीड भागातील भाविकांसाठी राणा रणजितसिंह चौव्हाण यांच्या पुढाकाराने वाहनसेवेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी व्यापारी बांधव, ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत प्रस्थान करण्यात आले.

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे दि.८ जूनपासून शिवकथेला सुरुवात झाली. यावेळी लाखो भाविक विविध ठिकाणाहून बीडमध्ये दाखल झाले. अशावेळी अनेक भाविकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता कै.रणजितसिंह (भाऊ) चौव्हाण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नगरसेवक राणा रणजितसिंह चौव्हाण यांनी पेठ बीड भागातील भाविकांसाठी हिरालाल चौक ते चाकरवाडी जाण्या–येण्यासाठी वाहन उपलब्ध करत भाविकांची होणारी गैरसोय टाळली. सोमवार दि.८ जून रोजी सकाळी १० वाजता त्या सेवेचे बीड येथून हिरालाल चौक येथील व्यापारी बांधव, महिला भाविक यांच्या हस्ते महादेवाचे पूजन करून चाकरवाडीकडे प्रस्थान झाले. ही वाहतूक सेवा पुढील सात दिवस असणार आहे. रोज सकाळी १० वाजता हिरालाल चौक येथे उपलब्ध असेल.

# स्व.आर.टी.जिजा संयम आणि निष्ठेचे प्रतिक होते

## गंगापूजन कार्यक्रमात ना.पंकजाताई मुंडे यांनी दिला आर.टी. देशमुख यांच्या आठवणींना उजाळा



परळी (सरकार) माजी आमदार आर.टी. देशमुख यांच्या गोडजेवण कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमात त्यांनी देशमुख यांच्या स्मृतींना उजाळा देताना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, संयम, निष्ठा, प्रेम आणि जिव्हाळा म्हणजेच आर.टी. देशमुख जिजा होते. त्यांच्या अचानक निधनाने मला मोठा धक्का बसला. ते केवळ राजकीय सहकारी नव्हते, तर माझ्यासाठी एक भावनिक आधार होते. मी अनेक वेळा अडचणीत असताना त्यांनी मार्गदर्शन केलं. त्यांच्या चेहऱ्यावर कधीही चिंता दिसली नाही. अत्यंत शांत, संयमी आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही खूप मोठी पोकळी आहे. यानिमित्त हभप यशवंत महाराज पाटील यांचे कीर्तन झाले. त्यांनी 'कर्तव्यनिष्ठ जीवनाची प्रेरणा' या विषयावर भावस्पर्शी कीर्तन सादर केलं. कीर्तन श्रवण करताना पंकजाताईंच्या डोळ्यांत अश्रू तरळले. कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ व देशमुख यांचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाकरवाडीतील शिवमहापुराण कथेला ना.पंकजाताई मुंडेंची भेट

## माऊली महाराजांचे कार्य आजही समाजाला दिशादर्शक

केज (सरकार) विसाव्या शतकातील महान संत, ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यस्मरणानिमित्त चाकरवाडीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा सोहळ्याला आज प्रारंभ झाला. या सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून दर्शन, कथाश्रवण व शिवमहापुराण कथेच्या आरतीत सहभाग घेतला.

ना.पंकजाताई मुंडे यांनी या दिव्य सोहळ्याला भेट देऊन महाराजांचे दर्शन घेतले, तसेच पं. प्रदीप मिश्रा यांच्या प्रभावी



शैलीतील शिवमहापुराण कथेतील आरतीत सहभागी होत, हजारो भाविकांबरोबर भक्तिभावाने या वातावरणात रममाण झाल्या.या वेळी महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी पंकजाताईंचे या सोहळ्यात औपचारिक स्वागत केले. २० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर महाराजांच्या विचारांचे स्मरण करताना पंकजाताईंनी सांगितले की, बीड जिल्ह्यात संत ज्ञानेश्वर माऊलींनी सामाजिक आणि अध्यात्मिक परिवर्तनाचा जो मार्ग दाखवला, तो आजही आपल्याला प्रेरणा देतो. त्यांच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळाली आणि एकात्मतेचा संदेश पसरला.ही श्रद्धा आणि भक्ती हीच आपल्या संतपरंपरेची खरी ताकद आहे. अशा सोहळ्यांमधूनच समाजाला सकारात्मकता आणि एकोप्याचा संदेश मिळतो असे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. शिवमहापुराण कथेचे कथाव्यास पं. प्रदीप मिश्रा यांचे दर्शन घेऊन पंकजाताई मुंडे यांनी आरतीमध्ये सहभाग घेतला.या कार्यक्रमास हजारो भाविक उपस्थित होते.

## तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवणे सामूहिक जबाबदारी–डॉ.आदिती सारडा

बीड (सरकार): तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला आहे. या महाविद्यालयात कम्युनिटी डेंटिस्ट्री विभाग समाजातील दंत आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्य तपासणी तसेच जनजागृती शिबिरे आयोजित करत आहे. या उपक्रमांतर्गत, तंबाखूविरोधी जनजागृती आणि सल्ला देण्याची सेवा देखील दिली जाते. या सेवांसाठी कॉलेजकडे सुसज्ज मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त जनजागृती करून तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे आवाहन कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अदिती सारडा यांनी केले. आदित्य शिक्षण संस्थेत ३१ मे रोजी जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त आदित्य डेंटल कॉलेज, बीड येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'तंबाखू विरोधी सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे शिवराज्याभिषेक सोहळा

बीड (सरकार): महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा राज्याभिषेक सोहळा दि. ६



जून २०२५ बीड श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे शवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी सुप्रिया वाघ मॅडम व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी शिवराज्याभिषेकाबद्दल विस्तृत माहिती शाळेतील शिक्षिका अनिता भालेराव मॅडम यांनी सर्वांना दिली.सध्या श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे सध्या श्रद्धा कोर्स सुरू आहे या कोर्स दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्याचा कार्यक्रम देखील घेण्यात आला या वेळेला श्रद्धा कोर्स घेणार्या सुप्रिया वाघ मॅडम यांनी व मुख्याध्यापक अनिता सुर्यवंशी मॅडम छ.शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण कोल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका पूजा लांडे मॅडम यांनी केले तर यावेळी शाळेतील शिक्षिका अपूर्वा कुलकर्णी मॅडम यांनी शिवराज्याभिषेकावर आधारित एका कवितेचे सादरीकरण केले. या सोहळ्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद सहकारी वृंद उपस्थित होते.

# सुनंदा कोरडे अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित

माजलगाव (सरकार): भारतीय जनता पार्टी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समितीच्या वतीने सुनंदा प्रशांत कोरडे यांना अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यासोबतच संयोजकाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या भारतमाता सभागृहात हा देखणा व नेत्रदीपक सोहळा पार पडला.

याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख होते तर उद्घाटक म्हणून संस्कार प्रांताध्यक्ष स्नेहल पाठक होत्या. प्रमुख व्याख्याते म्हणून इतिहास अभ्यासक डॉ.अशोक बांगर यांनी अनमोल मार्गदर्शन केले. यावेळी अमरनाथ खुर्पे, डॉ .प्रशांत पाटील, देविदास नागरगोजे, प्रकाश दुग्गड, अभय कोकड, तुकाराम येवले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर व गोविंद गोचडे यांनी केले. यावेळी बोलताना व्याख्याते डॉ. अशोक बांगर यांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शिवाला अर्थात शंकराला समर्पित असा राज्यकारभार केला.

# वादळीवाऱ्यासह पावसात बाभळीचे झाड कोसळुन वीजेची तार तुटली

बीड (सरकार) तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिर गेल्या ४ दिवसांपासून वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने भास्कर आबदार यांच्या शेतातील रोडलगतचे बाभळीचे झाड विजेच्या तारांवर कोसळल्याने विजेच्या तारा तुटलेल्या आहेत त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला असुन महावितरणला कल्पना देऊनही अद्याप वीज तारा जोडण्यात आल्या नसल्याने भालचंद्र गणपती मंदिर अंधारात असुन भाविकांमध्ये याबद्दल तिव्र नाराजी असुन तातडीने महावितरणने वीजेच्या ताराची जोडणी करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे आणि हरिओम क्षीरसागर यांनी प्रभारी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश यांना केली आहे.



४ दिवसांपूर्वी झालेल्या वादळीवाऱ्यासह पावसात बाभळीचे झाड पडल्याने वीज तारा तुटलेल्या गणपती असुन मंदिरात अंधार असल्याची कल्पना पुजारी श्रीकांत जोशी यांनी मला दिल्यानंतर आज सकाळी सरपंच बालासाहेब जाधव यांना याची कल्पना दिल्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने बाभळीचे झाड बाजुला सारले.प्रभारी उपअभियंता महावितरण उपकेंद्र लिंबागणेश अभिजित शिंदे यांना कल्पना दिल्यानंतर लाईनमन आमीर सय्यद यांना सांगतो म्हणाले परंतु अद्याप वीज तार जोडण्यात आली नाही त्यामुळे मंदिर अंधारातच आहे. गणेश भक्तांची गैरसोय होत असल्याने भाविकात तिव्र नाराजी आहे. ४ दिवसांपासून मंदिर अंधारात असुन पुजा अर्चना करताना अडचण येते त्याच बरोबर मंदिरात पिण्याच्या पाण्यासाठी येणाऱ्या ग्रामस्थांची तारांबळ होत असुन त्यांना हात हलवत माघारी जावे लागते. वीज जोडणी करण्यात यावी अशी महावितरणच्या अधिकाऱ्यांना मागणी केली आहे परंतु अद्याप जोडणी करण्यात आलीच नाही. जिल्हा परिषद सर्कलचे गाव असणाऱ्या लिंबागणेश येथील ३३ के.व्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद हुलकुडे यांची बदली झाल्यानंतर गेल्या वर्षभरापासून रिक्त असुन सध्या चौसाळा येथील उप अभियंता अभिजित शिंदे यांच्याकडे प्रभारी पदाचा कार्यभार आहे. उप अभियंता पदी नियुक्ती साठी अधिक्षक अभियंता महावितरण कार्यालय बीड यांना निवेदन तसेच आंदोलनानंतरही पद भरण्यात येईल असे आश्वासन देऊनही अद्याप पद भरण्यात आले नाही त्यामुळे महावितरण कडुन वेळेवर सुविधा मिळत नाहीत त्यामुळे तातडीने रिक्त पद भरण्यात यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९ (या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779

(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)